करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक
कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०


Shweta Gift & Toys
श्वेता गिफ्ट अॅन्ड टॉईज
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३५ | पाने-१२ | दि.२०/०६/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रु.

हॉटेल राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
फॅमिली
• शुध्द शाकाहारी
• चायनीज

लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी सर्व सुविधा उपलब्ध..!
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444)

# मकाई सहकारी साखर कारखाना यावर्षी पूर्ण क्षमतेने चालणार : चेअरमन दिनेश भांडवलकर

करमाळा : श्री मकाई सहकारी साखर कारखाना यावर्षीचा गाळप हंगाम पूर्ण क्षमतेने चालवणार आहे. त्यादृष्टीने सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून कामांची गत अत्यंत समाधानकारक आहे; अशी माहिती मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर यांनी दिली.

पुढे बोलताना भांडवलकर म्हणाले, की आमच्या मार्गदर्शक रश्मीदिदी बागल व युवा नेते दिग्विजय बागल यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे काम सुरळीत सुरू आहे. कारखान्याच्या व्यवस्थापकीय संचालक पदी सुनील दळवी यांची नव्याने नियुक्ती करण्यात आलेली आहे. कारखान्याच्या विविध विभागामध्ये पुन्हा जोमाने कामाला सुरूवात झाली असून, अकौंट विभाग पुन्हा कार्यरत झाला आहे. याशिवाय बंद पडलेला वीजपुरवठा व पाणीपुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला आहे.



या हंगामात मकाई सहकारी साखर कारखाना कोणत्याही प्रकारची अडचण न घेता पूर्ण क्षमतेने सुरू राहील. शेतकऱ्यांचे कोणतेही पैसे थकीत राहणार नाहीत. संपूर्ण संचालक मंडळ एकसंघपणे काम करत असून, शेतकऱ्यांना इतर कारखान्याच्या तोडीचा दर दिला जाईल. शेतकऱ्यांना बाजारभावात अन्याय होणार नाही. त्यामुळे सभासदांनी मकाई कारखान्यास ऊस घालावा.

**...दिनेश भांडवलकर (चेअरमन-मकाई कारखाना)**

यावर्षी ऊस गाळप हंगामासाठी १३० वाहतूकदारांशी करार केले असून तीन ते चार नवीन यंत्रसामग्रीचे नियोजनही अंतिम टप्प्यात आहे. संचालक मंडळ, अधिकारी व कामगार एकत्रितपणे काम करत असल्याने कारखान्याचे व्यवहार व्यवस्थित सुरू आहेत. कारखान्याच्या शेती विभागाने वाहन कराराची पुर्तता केली असून आता ऊस नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा; असे आवाहन केले आहे.

कारखान्याच्या कर्ज व आर्थिक स्थितीबाबत बोलताना चेअरमन दिनेश भांडवलकर म्हणाले, की मकाई सहकारी साखर कारखान्याची आर्थिक स्थिती चांगली असून कोणत्याही अडचणीशिवाय कारखाना सुरू राहणार आहे. आवश्यक ते कर्ज मिळालेले आहे. इतर खाजगी बँकांची कर्जे वन टाईम सेटलमेंटद्वारे परतफेड करण्यात आली आहेत. यामुळे कारखान्याला व्याजात चांगली सवलत मिळाली आहे.


शेतकऱ्यांचे कोणतेही देणे थकीत नाही. कामगारांचे काही पगार बाकी असले तरी त्याचे नियोजन करण्यात आले आहे व लवकरच ते दिले जातील. त्यामुळे कामगारांनी कोणतीही काळजी करू नये. त्यांनी वेळेनूसार आपली कामे सुरू करावीत.

सुवर्णसंधी...!! सुवर्णसंधी..!! सुवर्णसंधी..!!!

राजुरकर नगर
आजच आपला प्लॉट बुक करा..!
प्लॉट विक्री चालू आहे







■ कलेक्टर अंतिम मंजुरी एन.ए.प्लॉट
■ भव्य प्रवेशद्वार
■ वास्तुशास्त्रानूसार प्लॉटची मांडणी
■ चारही बाजूनी संरक्षक भिंत
■ नगरपालिका पाणी नियोजन
■ अंडरग्राउंड ड्रेनेजची व्यवस्था
■ थ्री फेज लाईटची सुविधा
■ लहान मुलांसाठी क्रीडांगण
■ रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण

संपर्क
स्वप्नील राजुरकर
मो.9421477400

पत्ता : देवी हायस्कुल समोर, पुणे रोड, करमाळा. जि.सोलापूर

Scanned with OKEN Scanner

आगकाडीनं घर जळतं.., रागानं घराणं जळतं..!

## संपादकीय.........................................!

# क्षणभराचा राग आयुष्यभराची शिक्षा..!

आपण खरंच जगत आहोत का ? की फक्त भूतकाळाच्या दु:खामध्ये आणि वर्तमानातील राग-आकसामध्ये अडकून आपलं भविष्य संपवण्याची तयारी करत आहोत ? माणूस म्हणून आपण अशा छोट्या कारणांनी पेटून उठतो की त्या आगीत आपली स्वत:चीच जिवंत स्वप्नं होरपळून जातात. आज हे चित्र समाजाच्या प्रत्येक कोपऱ्यात दिसून येतंय. एकमेकांवरचा अविश्वास, खोट्या प्रतिष्ठेच्या मागे धावणं, क्षुल्लक कारणावरून टोकाची कृती आणि त्यातून उद्भवणारं अवघ्या कुटूंबाच्या नाशाचं चक्र..!

परवा अर्जुननगरमध्ये एका ६५ वर्षीय वृध्द व्यक्तीला भुजंग रोकडे यांना चारीत झाडाच्या फांद्या टाकू नका.. एवढं म्हणणं जीवावर बेतलं. रागाच्या भरात झालेल्या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला आणि दोन भावांचा आयुष्यभरासाठी तुरूंगवास ठरला. ना चारी झाली, ना पाईपलाईन पूर्ण झाली. पण दोन कुटूंब उध्वस्त झाली !

दुसरी घटना करमाळा येथील वैष्णवी माने यांची. एक सुशिक्षित विवाहित युवती, चार वर्षाच्या मुलाची आई गळफास लावून जीवन संपवते. कारण ? काही घरगुती ताण, त्रास किंवा भावनिक वेदना. पण त्या वेदनांवर मात करण्याऐवजी तिने स्वत:चं भविष्यच संपवलं. आज तिचं मुल आईविना, कुटूंब अंधारात आणि ज्या लोकांवर तिने राग धरला ते जेलमध्ये !

राग ही भावना नैसर्गिक आहे, पण विचारशून्य. राग हा विनाशाचा पहिला टप्पा असतो. अग्नी फक्त एका वस्तुलाच जाळतो; पण राग संपूर्ण माणसाचा संसार जाळून टाकतो. क्षणिक रागाचा उद्रेक हा नंतरच्या अनेक वर्षाच्या पश्चातापाचं मूळ ठरतो. आयुष्य एकच मिळतं आणि ते सुध्दा रोज थोडंसं कमी होतंय ! पण आपण काय करतो ? क्षणभराच्या भावनांना, अहंकाराला, गैरसमजाला इतकं महत्वं देतो की त्या एका क्षणात आपलं संपूर्ण भविष्य झाकोळून जातं. आपण वर्तमानात एक चुकीचा निर्णय घेतो आणि मग त्याचे परिणाम आयुष्यभर भोगत राहतो. कधी तुरूंगात, कधी पश्चातापात आणि कधी पोकळीने भरलेल्या मनात.

संताच्या भाषेत सांगायचं झालं तर..

राग न धरावा मना रे साचा, आपुल्या जीवाचा तोचि वैरी । - संत नामदेव

संताचे हे शब्द म्हणजे हजारो वर्षांचा अनुभव आहे. राग हा बाहेरच्या माणसाला झोंबतोच, पण तो आपल्यालाच आतून जाळून टाकतो. याला उपाय नक्की आहे.., इतरांवर रागावण्याऐवजी त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करावा. आज बहुतेक लोक इतरांवर रागावतात, पण स्वत:शी संवाद करत नाहीत. स्वत:च्या चुका पाहत नाहीत. राग, द्वेष, अहंकार या गोष्टींमध्ये वेळ घालवतात आणि खरं आयुष्य निसटून जातं.

राग आल्यावर थांबा- श्वास घ्या. समोरच्याचा दृष्टीकोन समजून घ्या. काही वेळ शांत राहणं हे लढणं नाही - ते शहाणपण आहे. स्वत:च्या कुटूंबाचा विचार करा - तुम्ही गेलात तर त्यांचं काय ? शेवटचा विचार - ही वेळ पुन्हा नाही. रागात घेतलेले निर्णय पश्चातापाने भरून काढावे लागतात. मनात राग येतो, हे स्वाभाविक आहे. पण तो राग कृतीत उतरतो तेव्हा विनाश अटळ होतो. म्हणून राग जिंकला तर आयुष्य जिंकलं !

आपलं भविष्य आपल्याच हातात आहे. त्याला रागाने पेटवायचं की प्रेमाने सजवायचं; हा निर्णय आपलाच आहे. आज आपल्याला गरज आहे ती स्वत:च्या मनाकडे पाहण्याची. पैसा, प्रतिष्ठा, अहंकार तात्पुरत्या कुरबुरी.. या सगळ्या गोष्टींना जरा दूर ठेवा. खरं महत्व आहे, आपलं मानसिक स्वास्थ, आपलं भविष्य आणि आपली माणसं सांभाळण्यात !

जीवन एकदाच मिळतं.. ही वेळ पुन्हा येणार नाही. ही संधी पुन्हा मिळणार नाही. जगताना विचारपूर्वक जगलं तरच आपण स्वत:सह आपल्या कुटूंबासाठी शांतता, समाधान आणि सन्मानाचं जीवन उभं करू शकतो. मनावरचा राग जिंकणं म्हणजेच आयुष्य जिंकणं असतं हे विसरून चालणार नाही !

## केम येथे नवागत विद्यार्थ्यांचे ट्रॅक्टर मधून मिरवणूक काढून स्वागत



करमाळा(सं.प्र.): केम येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत उत्साहात आणि पारंपारिक पध्दतीने करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांची ट्रॅक्टर मधून प्रभातफेरी काढून गावातून हलगीच्या तालावर, देशभक्तीपर गीते, बालगीते आणि घोषणांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आला. यावेळी सरपंच सारिका कोरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आण्णासाहेब तळेकर, उपाध्यक्षा पुजा धर्मराज, महेश शिंदे, नवनाथ केंगार, सागर तळेकर, सागर दौंड, आनंद शिंदे, बालाजी अवताडे यांचेसह केंद्रप्रमुख महेश्वर कांबळे, सर्व शिक्षक, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## उमरड शाळेत आ.नारायण पाटील यांचे हस्ते पाठ्यपुस्तकांचे वाटप



करमाळा(सं.प्र.): उमरड येथील जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून आमदार नारायण पाटील यांचे हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, माजी सरपंच प्रमोद बदे, आदिनाथचे संचालक राजाभाऊ कदम यांचेसह शाळेतील सर्व शिक्षक, पालक उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार पाटील म्हणाले, की जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये सर्वसामान्य गोरगरीब शेतकऱ्यांची मुले-मुली शिक्षण घेतात. त्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी शिक्षकांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावा. पालकांनी देखील अधून-मधून शाळेत भेटी देऊन शिक्षकांच्या, शाळेच्या अडीअडचणी समजून घेतल्या पाहिजेत. शिक्षकांना व शाळेला मदत केली पाहिजे. शाळा व पालक एकत्र आले तर निश्चित शाळेची गुणवत्ता वाढेल; असा विश्वास व्यक्त केला.

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with OKEN Scanner

शुक्रवार दि.२० जून २०२५ | संदेश साप्ताहिक कमलाभवानी



प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# शहर विकास आघाडीच्या वतीने घंटानाद आंदोलन




करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील वाढत्या नागरी समस्या आणि सुविधांचा अभाव या विरोधात करमाळा शहर विकास आघाडीच्या वतीने नगरपरिषद समोर घंटानाद आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन सावंत गटाचे नेते सुनील सावंत यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी कामाला सुरूवात केली जाईल; असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी सावंत म्हणाले, की शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून नागरीकांना पाच-पाच दिवस पाणी मिळत नाही.रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. आषाढी एकादशीला पंढरपूरला जाणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांची कुचंबना होवू नये म्हणून रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करण्यात यावी. शहरातील गटारी तुडूंब भरलेल्या असून अनेक ठिकाणी कचरा साचलेला आहे. त्यामुळे शहरात स्वच्छता मोहिम राबवावी तसेच जंतूनाशक पावडर व फिनेलची फवाणी करण्यात यावी; अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली होती. या आंदोलनात माजी नगरसेवक फारूक जमादार, रविंद्र कांबळे, दिपक सुपेकर, भारिपचे देवा लोंढे, हुमरान मुलाणी, गणेश अडसुळ, पांडूरंग सावंत, साजिद बेग, विलास क्षीरसागर, साबीर शेख, बापू मोरे, जमीर सय्यद, राजेंद्र कसाब, बापू उबाळे, भाऊ दुधाळ, जमील काझी, संभाजी गायकवाड, मार्तंड सुरवसे, दत्ता कांबळे आदींसह शहरातील नागरीक मोठ्या संख्येने सहभागी होते. आंदोलन स्थळी पोलीस कर्मचारी बिभिषण जाधव, गणेश दळवी, भाऊसाहेब शेळके, गणेश शिंदे यांनी बंदोबस्ताची जबाबदारी पार पाडली.

Patanjali wellness | पतंजलि

पतंजली योगपीठ
के तत्वावधान मे
"योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ"
११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित..

योग महोत्सव - दि.२१ जून २०२५
• वेळ : सकाळी ८.०० ते ९.००
• स्थळ : कन्या प्रशाला, श्री कमलादेवी रोड, करमाळा.
सौजन्य
• प्रविण जनरल स्टोअर्स, दत्तपेठ, करमाळा. • अलंकार ज्वेलर्स, दत्तपेठ, करमाळा.
• श्री.हनुमानसिंग परदेशी (योगशिक्षक), करमाळा. • श्री.जीवन संचेती (सोहम ट्रेडर्स, करमाळा)

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...

जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

• काशी दर्शन यात्रा •
काशी, गया, अयोध्या, प्रयाग
दि.२५/७/२०२५ ते २/८/२०२५
सहल खर्च : १४,८००/-

• २ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा •
उज्जैन, ओंकारेश्वर, मंडलेश्वर, महेश्वर, इंदौर
दि.३/८/२०२५ ते ८/८/२०२५
सहल खर्च : ८,५००/-

• कन्याकुमारी •
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्
दि.११/८/२०२५ ते १८/८/२०२५
सहल खर्च : १०,०००/-

• तिरूपती बालाजी दर्शन •
तिरूपती बालाजी, गोविंदराज, पद्मावती माता
दि.१९/८/२०२५ ते २२/८/२०२५
सहल खर्च : ११०००/- विमान प्रवास

• चारधाम दर्शन यात्रा •
यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ बद्रिनाथ, ऋषिकेश, हरिद्वार
दि.७/९/२०२५ ते २१/९/२०२५
सहल खर्च : ३५,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

• चारधाम यात्रा •
गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ बद्रीनाथ, हरिद्वार, ऋषीकेश
दि.७/१०/२०२५ ते १७/१०/२०२५
सहल खर्च : ३५,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

• केरळ दर्शन •
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, कन्याकुमारी त्रिवेंद्रम, मदुराई, मुन्नार, रामेश्वरम्
दि.२३/१०/२०२५ ते ४/११/२०२५
सहल खर्च : ३३,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

द्वारकाधाम
गिरनार पर्वत, जुनागड, पोरबंदर सोरटी सोमनाथ, नागेश्वर ज्योतिर्लिंग
दि.६/११/२०२५ ते १३/११/२०२५
सहल खर्च : ११,५००/-

• गंगासागर दर्शन •
गंगासागर, कलकत्ता, साक्षीगोपाल कोणार्क, भुवनेश्वर, जगन्नाथपुरी धाम
दि.१६/११/२०२५ ते २४/११/२०२५
सहल खर्च : १२,८००/-

• नेपाळ दर्शन •
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, लुंबिनी मनोकामना, काठमांडू, अयोध्या, प्रयागराज
दि.५/१२/२०२५ ते १८/१२/२०२५
सहल खर्च : २७,५००/- रेल्वे प्रवास 3-AC

रेल्वे प्रवास, बस प्रवास, भोजन व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय
संपर्क : 8888333638 I 8698333638 I 7218333638

करमाळा शहरातील मुख्य बाजारपेठेतील (राशिनपेठ)
गाळे भाड्याने देणे आहे
गाळे साईज : १८ फुट X ३७ फुट, ११ फुट X ४७ फुट
३० फुट X ४७ फुट (ग्राऊंड फ्लोअर व फर्स्ट फ्लोअर)
संपर्क : मो.9423235244 / 9763647980

शिलाई कोर्स
नवीन बॅचेस सुरू..!

■ डिजाइनर ब्लाऊज
■ डिजाइनर टॉप
■ डिजाइनर गाऊन
■ कुर्ती शिलाई
■ लहंगा शिलाई
■ लहान मुलांचे कपडे
■ जॅकेट ■ बेसिक कोर्स
ब्लाऊजचा पेपर कटींग करून मिळेल. तसेच डिजाइनर ड्रेसेस, लहंगा चोली, साडीचा ड्रेस स्टीच व कटींग करून मिळेल.
आजच संपर्क साधा..!
• पत्ता : शाहूनगर, करमाळा. | प्रेमा पवन अगरवाल (7507923861)

Scanned with OKEN Scanner

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून

# पांडे गटातील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करणार : संतोष वारे



करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष संतोष वारे हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप करणार आहेत. यामध्ये पांडे गटातील पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी दुकानातून वह्या न घेता राष्ट्रवादीच्या या सामाजिक उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संतोष वारे यांनी केले आहे. याबाबत वारे म्हणाले, की राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक उपक्रम राबवण्याच्या हेतूने तालुक्यातील रावगाव, वंजारवाडी, लिंबेवाडी, भोसे, मांगी हिवरवाडी, पोथरे, जातेगाव, खडकी, कामोणे आळजापूर, बिटरगाव श्री, श्रीदेवीचामाळ, पांडे, भालेवाडी, करंजे, घारगाव, खांबेवाडी, धायखिंडी, पाडळी, पोटेगाव, बाळेवाडी आणि तरटगाव या गावातील जिल्हा परिषद शाळेतील पहिली ते सातवी पर्यंतच्या एकूण २७६६ विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी लागणाऱ्या एकूण १७ हजार वह्या आणि पेन, पेन्सील, शार्पनर, पट्टी व खोडरबर या सर्व शालेय वस्तूंचे किट मोफत वाटले जाणार आहे. या गावातील पालकांनी आपल्या जि.प.शाळेत शिकणाऱ्या पाल्यांसाठी शालेय आणि नवोदय परीक्षेसाठी लागणाऱ्या वह्या दुकानातून न घेता राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने उपलब्ध करून दिलेल्या या मोफत वह्या वाटपाचा लाभ घ्यावा; असेही आवाहन वारे यांनी केले आहे.

# करमाळा वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.राम नीळ



करमाळा(सं.प्र.): करमाळा वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.राम नीळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. करमाळा वकील संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये नवीन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमध्ये अध्यक्षपदी ॲड.नीळ यांची तर उपाध्यक्ष पदी ॲड.अलिम पठाण, सचिव पदी ॲड.विनोद चौधरी, सहसचिव पदी ॲड.बालाजी इंगळे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया मावळते अध्यक्ष ॲड.रविंद्र बरडे यांच्या अध्यतेखाली पार पडली. बैठकीत सचिव ॲड.चौधरी यांनी गत वर्षाचा अहवाल सादर केला. वकील संघाच्या परंपरेनूसार सेवाज्येष्ठतेनूसार अध्यक्ष पदाचा मान दिला जातो. यानूसार ॲड.नीळ यांना अध्यक्ष पदाची संधी देण्यात आली. निवडीनंतर वकील संघाच्या वतीने नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# आषाढीवारी पूर्वी शहरातील रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करा

## भाजपाची नगरपरिषद प्रशासनाकडे मागणी



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील आणि लगतच्या अनेक रस्त्यांची दुरावस्था झालेली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. त्या ठिकाणी तातडीने रस्ते दुरुस्ती करण्याची गरज आहे. बाहेरील रस्त्यांच्या कडेला काटेरी झाडे, झुडपे वाढलेली आहेत. त्यामुळे अपघात घडू शकतात. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले आहे. अशा ठिकाणी कायमस्वरूपी उपाय योजना कराव्यात; अशी मागणी भाजपाचे सरचिटणीस जितेश कटारिया यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. आषाढी एकदाशीनिमित्त करमाळा शहर परिसरातून अनेक दिंड्यामधून लाखो वारकरी तसेच संत निवृत्ती महाराजांची पालखी देखील शहरातून पंढरपूरच्या दिशेने जातात. याशिवाय याशिवाय पंढरपूरला जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी नगर-पालिकेच्या वतीने शहरात ठिकठिकाणी फिरते शौचालय, कचऱ्याचे नियोजन, पाणीपुरवठा, वैद्यकिय सेवा आणि निवाऱ्याचे योग्य ते नियोजन तातडीने करून तसे फलक वारकऱ्यांना दिसतील अशा दर्शनीय भागात लावावेत. वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची काळजी नगरपालिका प्रशासनाने घ्यावी; अशीही मागणी जितेश कटारिया यांनी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी यांचेकडे केली आहे. यावेळी किसान मोर्चाचे प्रदेश सचिव दिपक चव्हाण, माजी शहराध्यक्ष संजय घोरपडे, बाळासाहेब कुंभार, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, जिल्हा सरचिटणीस किरण बोकन, शहर उपाध्यक्ष सचिन चव्हाण, मनोज कुलकर्णी उपस्थित होते.


विश्वास तुमचा.., मार्गदर्शन आमचे.., यश तुमचे..!
करमाळा शहरातील एकमेव शासनमान्य संस्था

**अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट**

संस्था कोड : 23064 (संगणक अभ्यासक्रम कोड : 230640211830)

**कॉम्प्युटर टायपिंग**

- इंग्रजी : ३०, ४० श.प्र.मि.
- मराठी : ३०, ४० श.प्र.मि.
- हिंदी : ३०, ४० श.प्र.मि.



**प्रवेश प्रक्रिया सुरू आहे**

वैशिष्ट्ये...
- महिला व मुलींसाठी स्वतंत्र बॅच
- महिला व मुलींसाठी महिला शिक्षिका
- मोफत इंटरनेट व वाय-फाय सुविधा उपलब्ध
- सुसज्ज कॉम्प्युटर लॅब व ऑनलाईन टायपिंग सराव
- अनुभवी शिक्षक वृंद
- १००% यशाची खात्री

सर्व शासकीय स्कीम लागू

ब्राह्मण, राजपुरोहित राजपुत, मारवाडी, गुजराथी इ. जाती मधील युवक-युवतींना कोर्स 100% फ्री

टीप : बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना एस.टी.पासची सोय

पत्ता : जुन्या कोर्टासमोर, किल्ला विभाग, करमाळा.
संपर्क : अलोक आवाड (8087905085, 9975606162)



डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.) यांचा

**अनुजा दातांचा दवाखाना**

वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)

**उपलब्ध सुविधा**

- स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
- पोर्टेबल एक्स-रे
- वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
- लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
- दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
- वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
- दात काढणे
- शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
- इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
- दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
- डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
- पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
- जबड्याच्या आजारांचे निदान
- रूट कॅनल ट्रीटमेंट
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
- पुढील दातांमधील गॅप बंद करणे
- दात पांढरे/शुभ्र करणे
- इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
- मुख कर्करोग निदान
- तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग





कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.


Scanned with OKEN Scanner

### शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने

# खा.संजय राऊत लिखित 'नरकातला स्वर्ग' पुस्तक ज्ञानेश्वर वाचन मंदिरास भेट



करमाळा(सं.प्र.): युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांचा वाढदिवस शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी लिहिलेले 'नरकातला स्वर्ग' हे बहुचर्चित पुस्तक नगरपालिकेच्या ज्ञानेश्वर वाचन मंदिरास भेट देण्यात आले. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख आशाताई टोणपे, शिवसेना शहरप्रमुख प्रविण कटारिया, उपजिल्हाप्रमुख संजय शिंदे, शाहूदादा फरतडे, युवासेना तालुका युवा अधिकारी समाधान फरतडे, शहर संघटक प्रसाद निंबाळकर, उपजिल्हा युवा अधिकारी सागर तळेकर, युवा सेना उपशहरप्रमुख पंकज परदेशी, जय महाराष्ट्र मित्र मंडळाचे उपाध्यक्ष महंमद हाफिज कुरेशी, इन्नुस मणेरी व ग्रंथपाल दत्तात्रय घोलप उपस्थित होते. यावेळी शिवसेना शहप्रमुख प्रविण कटारिया म्हणाले, की खासदार राऊत यांनी लिहिलेले पुस्तक समाजातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकणारे असून ते वाचकांना निश्चितच विचारप्रवृत्त करेल. ज्ञानेश्वर वाचन मंदिर सारख्या ठिकाणी हे पुस्तक उपलब्ध झाल्याने अधिकाधिक वाचकांना त्याचा लाभ घेता येईल. यावेळी आशाताई टोणपे, समाधान फरतडे यांनी पुस्तकाबद्दल आपले विचार व्यक्त केले.

# यश कलेक्शनचे राजकुमार दोशी यांना उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित




करमाळा(सं.प्र.) : येथील प्रसिध्द व्यापारी व यश कलेक्शनचे सर्वेसर्वा राजकुमार दोशी यांना दैनिक दिव्य मराठी समुहाच्या वतीने यंदाचा सोलापूर पॉवर ५० आयोजित पुरस्करातून उद्योगरत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. राजकुमार दोशी हे यश कलेक्शनचे मालक असून त्यांचेकडे अनेक कर्मचारी मोठ्या आनंदात काम करतात. अनेक कुटूंबाचे ते आधारवडच आहेत, असे बोलले जाते. स्वच्छ विचारसरणी, स्वच्छ मनाचा व दानशूर वृत्तीची व्यक्ती म्हणूनही त्यांचेकडे पाहिले जाते. त्यांच्या असलेल्या अनेक दुकानांच्या माध्यमातून करमाळा शहराची शोभा वाढत आहे, असे म्हटलेतर वावगे ठरणार नाही. त्यांना मिळालेला पुरस्कार म्हणजे करमाळा तालुक्याच्या शिरपेचात एक दोशी परिवाराने मानाचा तुरा रोवला असल्याचे मत शहरातील नागरीकातून व्यक्त होत आहे.

डॉ.साळुंके स्कीन केअर क्लिनीक
त्वचा रोग निदान व उपचार
डॉ.रोहीत दिगंबरराव साळुंके
B.A.M.S., D.Derma(Ay)(Pune)
त्वचा व केशविकार तज्ञ
त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, सोयरायसिस, काळे डाग, पिंपल्स, चाई, कोड, स्ट्रेच मार्क, केस गळती, केसातील कोंडा, जुनाट खाज, ॲलजी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या, नखाचे आजार, सुरमा
वेळ सकाळी १० ते दुपारी २ व सायं.४ ते ८ पर्यंत (रविवारी सुट्टी राहील.)
पत्ता : कमलादेवी रोड, करमाळा. (9404692188, 7387376531)

खुशखबर दर सोमवारी मुळव्याध इंजेक्शन (Scelro - Theropy) खुशखबर
फक्त 10,000/- मध्ये पहिल्या पाच पेशंटसाठी मर्यादित !
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
• मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब • एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब • संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे • संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा • संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर • चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
मो.9763035862
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
ओपीडीचे वैशिष्ट्ये...
• इंजेक्शन सुविधा • लेझर सुविधा
• प्रभावी औषधी सुविधा
• मेडिक्लेम सुविधा उपलब्ध • मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
• आठवड्यातून दोनदा ओपीडी • पार्किंगची व्यवस्था
सुचना १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# राज्यस्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धा - सुरताल संगीत विद्यालयाचा उपक्रम

करमाळा(सं.प्र.) : आयएसओ मानांकन प्राप्त सुरताल संगीत विद्यालय करमाळा यांचे वतीने आषाढी एकादशी निमित्त राज्यस्तरीय शालेय भक्तीगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी दिली.

याबाबत माहिती देताना प्राचार्य नरारे म्हणाले, की शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि भारतीय भक्ती परंपरेचे जतन करणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. ही स्पर्धा ऑनलाइन पध्दतीने आयोजित करण्यात आली असून स्पर्धकांनी दोन ते चार मिनीटांच्या व्हिडीओ रेकॉर्डीगद्वारे सहभाग नोंदवायचा आहे. या स्पर्धेत प्रथम बक्षीस ३००१ रू., द्वित्तीय बक्षीस २००१ रू., तृतीय बक्षीस १००१ रू. व उत्तेजनार्थ (२-३ विजेत्यांसाठी) प्रत्येकी ५०१ रूपये देण्यात येणार आहे. तसेच सर्व स्पर्धकांना संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र देखील देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी असून भक्तीगीत मराठी किंवा हिंदी भाषेत असावे. मुख्य गायक एकच असावा, कोरससाठी तीन आणि साथ संगीतासाठी तीन विद्यार्थी असू शकतात. सहभागी स्पर्धकांचा व्हिडीओ व शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र मो.नं.९४२२४४६८४१, ९४२३५३७४१५, ९९७०१९००४ या क्रमांकावर आषाढी एकादशीच्या सायंकाळी ५ वाजेपर्यंतच स्वीकारला जाणार आहे. स्पर्धेचा निकाल आषाढी एकादशीनंतर जाहीर केला जाईल

# वीजेच्या समस्येबाबत केमच्या सरपंच सारीका कोरे यांचा आमरण उपोषणाचा इशारा

करमाळा(सं.प्र.) : सुधारीत वितरण प्रणाली योजने अंतर्गत मंजूर झालेल्या केम सबस्टेशन ३३/११ केव्हीएसाठी २२० केव्ही जेऊर सबस्टेशन येथील स्वतंत्र बे व ३३ केव्ही नवीन लाईन निर्माणच्या कामाला अद्याप प्रारंभ न झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात केमच्या सरपंच सारीका कोरे यांनी महावितरण जेऊर उपविभागाला लेखी निवेदन दिले असून तात्काळ काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. सदर योजना २०२३ मध्ये मंजूर झाली असून या अतंर्गत संबंधित कामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे व कार्यकारी एजन्सीचीही नियुक्ती झाली आहे. मात्र कामाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत झालेल्या विलंबामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ग्रामसभेमध्येही हा विषय चर्चेला आला असून काम लवकर सुरु करावे; अशी मागणी वारंवार होत आहे. मागील नऊ वर्षापासून पाठपुरावा करून जेऊर (२२० केव्ही) सबस्टेशन मधून केम सबस्टेशनसाठी स्वतंत्र ३३ केव्ही ८ किमी लाईन व केमसाठी बे मंजूर करून घेण्यात आले आहे. सदरील लाईनचे टेंडर दोन वर्षापूर्वी झाले असून वीजेची बिकट समस्या असताना देखील अद्याप काम सुरू करण्यात आलेले नाही. सदरचे काम २३ जून पर्यंत पूर्ण न झाल्यास २४ जून रोजी सकाळी दहा वाजता केम सबस्टेशन कार्यालयसमोर आमरण उपोषण करण्यात येईल; असाही इशारा सरपंच कोरे यांनी दिला आहे.




Scanned with OKEN Scanner

## शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त
# शिवसेना-युवा सेना तर्फे मातोश्री वृध्दाश्रमास अन्नधान्य भेट



करमाळा(सं.प्र.) : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना व युवा सेना यांचे वतीने मातोश्री वृध्दाश्रम पांडे येथे अन्नधान्य भेट देण्यात आले. युवा सेना तालुका युवा अधिकारी समाधान फरतडे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख प्रविण कटारिया, उपजिल्हा प्रमुख संजय शिंदे, संतोष गानबोटे, संजय भालेराव, पंकज परदेशी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रविण कटारिया म्हणाले, की हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारातून ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण याला अनुसरून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी फरतडे यांनी पुढील काळात मातोश्री वृध्दाश्रमाला ज्या अडचणी येतील त्या सोडविण्याकामी शिवसेना संपूर्ण सहकार्य करेल. उपस्थितांचेस्वागत वृध्दाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब गोरे यांनी केले.




गीर गाईचे गावरान तुप मिळेल.
मो.9822058106


## श्रीदेवीचामाळ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी
# जगताप गटाचे अमोल चव्हाण यांची बिनविरोध निवड






करमाळा(सं.प्र.): श्रीदेवीचामाळ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी जगताप गटाचे अमोल हनुमंत चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या निवडी प्रसंगी उपसरपंच सचिन शिंदे, सदस्य बाळासाहेब सोरटे, दिपक थोरबोले, संतोष पवार तसेच जगताप गटाचे अभिमान पवार, दादासाहेब पुजारी, सतीश थोरबोले, अशोक चव्हाण, समाधान सोरटे, प्रमोद गायकवाड, संतोष चोरमले, विजय चव्हाण, सचिन चव्हाण, योगेश सोरटे, गणेश मचाले, निलेश बिडवे, युनूस शेख, रतिलाल चव्हाण, सुनील शिंदे, रत्नदिप पुजारी, अक्षय थोरबोले, अजय पवार, सूरज पवार, प्रतिक चव्हाण, रोहित चव्हाण, सागर चव्हाण, गौरव चौधरी व ग्रामस्थ उपस्थित होते. निवडीनंतर नूतन सरपंच अमोल चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना सरपंच अमोल चव्हाण म्हणाले, की श्रीदेवीचामाळ येथील वीज, पाणी, रस्ते आदी समस्या सोडविण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहणार आहे. तसेच गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटीबध्द असल्याचे सरपंच चव्हाण यांनी सांगितले.

श्रीदेवीचामाळ ग्रामपंचायतीचे नूतन सरपंच पदी अमोल चव्हाण यांची निवड झाल्यानंतर माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी त्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


धर्मवीर वैद्यकिय मदत सामाजिक संस्था ठाणे संचलित
College Code : 1384



श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (कॉलेज), करमाळा.

ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी 'नर्सिंग' क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी !

G.N.M. डिप्लोमा कोर्स
प्रवेश देणे सुरू

- कालावधी : ३ वर्षे
- शैक्षणिक पात्रता...
  १२ वी पास (सायन्स/कॉमर्स/आर्टस्)

मान्यताप्राप्त..
- महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक मंडळ, मुंबई
- महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई

- १००% नोकरीची हमी
- सर्व शासकीय शिष्यवृत्तींचा लाभ
- फक्त मुलींसाठी मोफत प्रवेश..
- जॉब प्लेसमेंट
- हॉस्टेल सुविधा
- हॉस्पीटल व्हिजीट्स व प्रशिक्षण
- इंग्लिश स्पीकींग क्लासेस



सुविधा...
- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय परदेशात, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, खाजगी रूग्णालय, जिल्हा परिषद रूग्णालयामध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी !
- मुलींकरीता सर्व सोयीनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
- प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी-स्पेशालिटी रूग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालये.
- सुसज्ज लॅब, इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब.
- अनुभवी प्राध्यापक वर्ग, नामांकित हॉस्पीटलशी संलग्न नोकरीची हमी.
- एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांना (शासकीय नियमानूसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.

पत्ता : अमरनाथ टॉवर, तिसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. फोन : (०२१८२)२९९५४७, ९५४५६२०९९९

२४ तास आपल्या सेवेत

मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल, करमाळा.

डॉ.ओंकार अभिमन्यु उघडे-पाटील M.B.B.S. (Gen.Physician) यांचे तज्ञ मार्गदर्शन व तपासणी

सुविधा : ॲडमीट, ऑपरेशन व सर्व रोगनिदान मेंदू-मणका व गुडघे/संधिवात, त्वचारोग, स्त्रीरोग तज्ञ

टीप : दर आठवड्याला तज्ञ डॉक्टरांची व्हीजीट सेवा

तपासणी फी फक्त Rs.100/-

पत्ता : अमरनाथ टॉवर, दुसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. मो.८४४६१३९५१३


Scanned with OKEN Scanner



करमाळा वकिल संघाच्या अध्यक्ष पदी

# ॲड.राम नीळ

यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन**

शुभेच्छुक

**ग्रामपंचायत उमरड, ता.करमाळा**

(सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य व ग्रामस्थ)



कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयाची विद्यार्थीनी **सई लहू तनपुरे** हिने इ.१० वीच्या परीक्षेत 99.40 टक्के गुण मिळवून करमाळा तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळवल्याबद्दल तसेच गणित विषयात 100 पैकी 100 गुण प्राप्त केल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**

शुभेच्छुक

**इरफान काझी सर** (शिक्षक : गणित भाग - १)

**प्रमिला खाटमोडे मॅडम** (शिक्षिका : गणित भाग-२)

**कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा**

# कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय

करमाळा., जि.सोलापूर

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६



इ.१० वी
शैक्षणिक वर्ष २०२४-२५
**सई लहू तनपुरे**
99.40% गुण मिळवून करमाळा तालुक्यात प्रथम. गणित विषयात 100 पैकी 100 गुण प्राप्त करून तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा !

सलग १६ वर्षे इ.१० वी सेमीचा **100% निकाल**

**इ.5 वी ते 9 वी सेमी मोफत प्रवेश !**

## प्रशालेची खास वैशिष्ट्ये

- इ.१० वी निकालाची वैभवशाली परंपरा
- तज्ञ व अनुभवी शिक्षक वृंद
- गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व वह्या वाटप
- नवोदय, स्कॉलरशीप, गणित संबोध, विज्ञान संबोध, चित्रकला, ग्रेड परीक्षा, खेळाचे मार्गदर्शन अशा विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन.
- प्रशालेची इमारत, परिसर CCTV च्या कक्षेत.
- मुलींच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथक, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समितीचे प्रभावी आयोजन
- इ.१० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, रात्र अभ्यासिका., गणित, सायन्स, इंग्रजीचे रोज जादा तास तसेच उन्हाळी सुट्टीत व्हॅकेशन.
- ई-लर्निंग सुविधा (डिजीटल वर्ग)
- सुसज्ज इमारत व भव्य खेळाचे मैदान

**संपर्क**

**श्री.सुनील जाधव** (मुख्याध्यापक) मो.9921451011
**श्री.रविंद्र शिंदे** (क्लार्क) मो.8605047554
**श्री.अर्जुन जगदाळे सर** मो.9881024867
**श्री.विजय धनवे सर** मो.9423333967




बँकींग क्षेत्रात महत्वाची व अवघड असलेली **'प्रोबेशनरी ऑफिसर'** पदाच्या परीक्षेत भारतीय स्टेट बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी व आमचे मित्र **श्री.जीवन संचेती साहेब** यांचे सुपुत्र

# मा.श्री.सोहम जीवन संचेती

यांनी सुयश संपादन केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

**के.बी.कन्स्ट्रक्शन, करमाळा जि.सोलापूर**

किशोर भगत, इंजि.प्रितम भगत व समस्त भगत परिवार, करमाळा.

Scanned with OKEN Scanner

# प्लॉट व जागा विकणे आहे

करमाळा शहर हद्दीतील निलज रोड येथील
**१ गुंठ्याचा १ प्लॉट व ५ गुंठे जागा विकणे आहे.**

**संपर्क : मो.नं.7038183101**



करमाळा शहरात प्रथम सुरू..!

Reg no.42433

**डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील**
( Clinical Cosmetologist & Trichologist )

**पाटील स्किन, हेअर अँन्ड जनरल क्लिनिक**

उपलब्ध सुविधा



- **त्वचा :** P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, बांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
- **केस :** P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे



- सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे
- सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार

**पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573**


## नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर येथे प्रवेशोत्सव साजरा



करमाळा(सं.प्र.): नगरपालिकेच्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमाने झाली. पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी संपूर्ण शाळा व परिसर रांगोळी, रंगरंगोटी व फुग्यांनी सजवण्यात आला होता. सर्वप्रथम नवगतांची प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना औक्षण करून, त्यांचेवर फुलांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत केले. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांचे पहिले पाऊस कागदावर उमटवून पालकांना देण्यात आले. त्यानंतर पाठ्यपुस्तक, गणवेश वाटप कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक संजय सावंत हे होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा डॉ.वर्षाताई करंजकर, सदस्य सचिन काळे, उज्वला ठाकूर, सौ.गाडे, सौ.मेटकरी तसेच पालकवर्ग आदी उपस्थित होते. मुख्याध्यापिका सुनंदा जाधव यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. शेरे गुरूजींनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक कोळी, सुनीता उबाळे, सुनीता भैलुमे, धनश्री उपळेकर, मंगल गलांडे, सुषमा उबाळे, आशा अभंगराव, वैशाली जगताप, अश्विनी ठाकरे, गौरव कोंडवार यांनी परिश्रम घेतले.

### सरपंच रवींद्र वळेकर यांच्या पाठपुराव्याला यश

## संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचा मार्ग होणार सुकर

करमाळा(सं.प्र.): संत निवृत्ती महाराज यांची पालखी करमाळा तालुक्यात रावगाव येथे प्रवेश करते व ती कोंढेज-निंभोरे मार्गे पुढे माढा तालुक्यात मार्गस्थ होत असते. या मार्गावरील कोंढेज ते निंभोरे हा चार किलोमीटरचा प्रवास अतिशय खडतर असल्यामुळे हा रस्ता पुढील वारीपर्यंत दुरूस्त झाल्यास आपण या रस्त्याने येऊ अन्यथा आपण मार्ग बदलू; असे दिंडी चालक यांनी निंभोरे ग्रामस्थांना सुचित केले होते. त्यानंतर सरपंच रविंद्र वळेकर यांनी या बाबीचा सातत्याने पाठपुरावा माजी आमदार संजयमामा शिंदे यांचेकडे करून १३ जून रोजी कोंढेज ते निंभोरे या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ ग्रामस्थांच्या उपस्थित करण्यात आला. माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या अर्थसंकल्पीय निधी मधून या मार्गासाठी २०२१-२३ मध्ये ३ कोटी ३२ लाख ५० हजार एवढी भरघोस निधीची तरतूद महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात केलेली होती. पुढे याच कामावरती स्थगिती आली आणि दरम्यान संजयमामा शिंदे यांनी एचएएम अंतर्गत ७१ किलोमीटरच्या रस्त्यासाठी २७० कोटीचा निधी मंजूर केला. हा मार्ग कोंढेज ते निंभोरे या मार्गावरून जात असल्यामुळे सदरची अर्थसंकल्पीय तरतूद रद्द करण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्षात काम सुरू व्हायला खूपच विलंब झाला.

सदर काम होणार की नाही अशी विचारणा दिंडी चालक व ग्रामस्थ यांच्या मधून वारंवार होत होती. अखेर याला उत्तर मिळाले असून एचएएम अंतर्गत सुरू असलेले काम विशेष बाब म्हणून निंभोरे ते कोंढेज या ठिकाणी सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामस्थ, संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी चालक व वारकारी यांनी माजी आमदार संजयमामा शिंदे व सरपंच वळेकर यांच्या कामावरती समाधान व्यक्त केले आहे.

### दहावीच्या परीक्षेत करमाळा तालुक्यात प्रथम आलेली

## सई तनपुरे हिच्या गुणपडताळणी दरम्यान अकरा गुणांची वाढ



करमाळा(सं.प्र.) : कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयाची विद्यार्थीनी सई लहू तनपुरे हिचा दहावीच्या परीक्षेत ९७.८० टक्के गुण मिळवून करमाळा तालुक्यात प्रथम क्रमांक आलेला होता. तरी तिने पुणे बोर्डाकडे गुणपडताळणी साठी अर्ज केला असता, सदर पडताळणीमध्ये तिच्या मुळ गुणामध्ये ११ गुणांची वाढ झाली असून आता तिची टक्केवारी ९९.४० टक्के झाली आहे व ती अजूनही तालुक्यात प्रथमच आहे. त्याच - बरोबर तिला गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त झालेले आहेत. तिला गणित विषय शिकवणारे काझी सर व खाटमोडे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल मुख्याध्यापक सुनिल जाधव, उपमुख्याध्यापक भस्मे सर, पर्यवेक्षक अंकुशखाने सर यांनी सई तनपुरे हिचे अभिनंदन केले व तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## स्नेहालय स्कूल मध्ये पुष्पगुच्छ देवून विद्यार्थ्यांचे स्वागत



करमाळा(सं.प्र.): शाळेच्या पहिल्या दिवशी स्नेहालय न्यू इंग्लीश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांचे पुष्प गुच्छ देऊन व औक्षण करून शिक्षकांनी स्वागत केले. यावेळी पालक व शिक्षकांच्या हस्ते श्री गणपती व स्वरस्वती पूजन करण्यात आले. प्रास्ताविक स्कूलच्या मुख्याध्यापिका धनश्री जयंत दळवी यांनी केले. यावेळी सौ.दळवी म्हणाल्या, की विद्यार्थ्यांचा पाया मजबूत असणे गरजेचे आहे. यासाठी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेचे समान शिक्षण देण्यावर आमचा प्रयत्न राहील. तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला पाहिजे आणि विविध खेळामध्ये यश मिळाले पाहिजे; यासाठी आम्ही सर्व शिक्षक प्रयत्न करणार आहे. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयंत दळवी सह पालक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.


# शिवरत्न ॲग्रो सर्व्हिसेस



प्रोप्रा : अमरजित साळुंके (मो.९८२३३७१४५७)

फिनोलेक्स ड्रिप, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, स्प्रे पाईप, मोटर., सर्व प्रकारची खते, कीटकनाशक, तणनाशक, बी-बियाणे., एचटीपी स्प्रे पंप, बॅटरी पंप तसेच शेती उपयोगी सर्व साहित्याचे **अधिकृत विक्रेते**

• नवीन पत्ता •

**बायपास चौक, उड्डाण पुलाजवळ, कमलादेवी रोड, करमाळा.**



# विघ्नहर्ता इंटिरीयर

प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम

**देवी प्लायवुड अँन्ड हार्डवेअर**

• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका

प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

**पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर**


Scanned with OKEN Scanner

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना
श्रीजय नेत्र रुग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे
M.S. Netra (Ayu) (Gold Medalist)
(नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
Reg no.1-77199-A
• मोतीबिंदू(Catract) आधुनिक मशिनद्वारे शस्त्रक्रिया
• डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
• Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते रात्री ९ (रविवार - सकाळी १० ते दु.२ पर्यंत)
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३
रिसेप्शनीस्ट नेमणे आहे. गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा !

घोलप हॉस्पिटल, करमाळा येथे
प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या गुरूवारी
इंदापूर येथील नामांकित जनरल, पोटविकार व लॅप्रोस्कोपिक सर्जन
डॉ.सौरभ चव्हाण
MBBS, MS, EFIAGES, FMAS
General, Gastrointestinal & Laparoscopic Surgenon
Fellowship in Advanced Laparoscopy & Endoscopy (USA)
यांची व्हीजीट सुरु झाली आहे.
खालील आजाराचे निदान, उपचार व शस्त्रक्रिया केले जातील.
• हर्निया, हायड्रोसिल
• पाईल्स, फिशर, फिस्चुला
• अॅपेन्डिक्स
• पोट, लहान व मोठे आतडे आजार
• स्तनगाठी व कॅन्सर
• पित्ताशय, स्वादुपिंड, पोटदुखी
• मूत्रपिंड, मूत्राशय व लघवीचे आजार
• थायरोईड ग्रंथीचे आजार
• डायबीटीसमुळे पायाला सुज व जखमा
• आतडे, स्तन, मुख कॅन्सर
• अॅक्सिडेंटमुळे छाती व डोक्याला मार
• दुर्बिणीद्वारे पोटाच्या शस्त्रक्रिया
तरी करमाळा तालुक्यातील नागरीकांनी याचा लाभ घ्यावा.
स्थळ : घोलप हॉस्पिटल, पुणे रोड, करमाळा.(वेळ : दुपारी २ ते ५)

## शाळेची पटसंख्या वाढवण्यासाठी सुजित बागल यांची अनोखी घोषणा



करमाळा(सं.प्र.) : मांगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ चिमुकल्यांच्या जल्लोषात आणि विशेष उपक्रमांने करण्यात आला. नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, मिठाई व खेळणी देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते व करमाळा तालुका वाचनालय संघटनेचे अध्यक्ष सुजित बागल यांनी मांगी जिल्हा परिषद शाळेत पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची पूर्ण एक वर्षाची घरपट्टी मी स्वत: भरणार असल्याचे जाहीर करत सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श पुढे ठेवला.

यामागची भुमिका स्पष्ट करताना सुजित बागल म्हणाले, की जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याने काही ठिकाणी शाळांचे वर्गच बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशा स्थितीत सरकारी शिक्षण व्यवस्थेला बळ देण्यासाठी प्रत्येकाने पुढे येणे गरजेचे आहे. छोटे प्रयत्न मोठा बदल घडवू शकतात. सुजित बागल यांच्या या सामाजिक निर्णयाचे ग्रामस्थांसह पालकांकडून कौतूक होत आहे. अशा उपक्रमामुळे जिल्हापरिषद शाळांना नवे बळ मिळेल; असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी मुख्याध्यापक हिरामण कौले, शिक्षिका सुवर्णा महामुनी, सौ.पवार, सौ.देमुंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे उमेश बागल, निखिल बागल, पोलीस पाटील आकाश शिंदे, किशोर बागल, शिवाजी राऊत आदी मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

## आण्णासाहेब जगताप विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत



करमाळा(सं.प्र.): येथील कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रमाने उत्साहात झाली. पाचवी व आठवी मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुनिल जाधव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक महादेव फंड उपस्थित होते. यावेळी बोलक्या भिंतीच्या पाचवीच्या वर्गाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्य-पुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक उपमुख्याध्यापक दत्तात्रय भस्मे यांनी केले. यावेळी त्यांनी शाळेची गुणवत्ता व प्रगतीची माहिती सांगितली.

९ वे पुण्यस्मरण



कै.अजित गणपत बुधवंत
(मृत्यू दि.३/७/२०१६, पुण्यस्मरण दि.२३/६/२०२५)
आता सहवास संपला तरी, स्मृती सुगंध देत राहील ।
जीवनाच्या प्रत्येक वळणावर , आठवण तुझी येत राहील ।।
कै.अजित गणपत बुधवंत
यांचे ९ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस
भावपूर्ण आदरांजली !
टीप : पुण्यस्मरण दिनानिमित्त दि.२३/६/२०२५ रोजी मुकबधीर शाळा, श्रीदेवीचामाळ येथे मिष्टान्न व संतसखु कन्या विद्यालय, पंढरपूर येथे वह्या वाटप होणार आहे.
शोकाकुल
गणपत गोविंद बुधवंत (गुरूजी), किशोर गणपत बुधवंत(सर), यश अजितकुमार बुधवंत
दादासाहेब भगवान जाधव (माजी सरपंच), विजुभैय्या अंगारशा
शिवनेरी क्रिडा मंडळ, रावगाव

FIRST DREAM
First Dream Interior & Decor
करमाळा शहरात प्रथमच एका छताखाली सर्व उपलब्ध..!
◂ प्लायवुड ◂ लॅमिनेट ◂ किचनट्रॉली ◂ रोलींग मॅट्रेस
◂ हार्डवेअर ◂ वॉलपेपर ◂ आर्टिफिशियल प्लांट ◂ पीव्हीसी पॅनल
◂ लॅमिनेट ◂ पडदे ◂ कस्टमाइज मॅट्रेस
ग्रे पेन्सील इंटेरिअर डिझाईन स्टुडिओ
Mob : 9307801886
संपर्क : मो.9960324999
श्रीदेवीचामाळ रोड, युनियन बँके शेजारी, बायपास चौक, शाहूनगर, करमाळा.

लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स
होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी, पार्टीवेअर साडी,
कॉटन साडी, लेडीज टॉप व कुर्ती, लेगीज, किड्स वेअर तसेच
रेडीमेड ब्लाऊजच्या भरपूर व्हरायटीज मिळतील
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.
विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रु. मध्ये मिळेल
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)

Scanned with OKEN Scanner

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, जेऊर संचलित
**भारत हायस्कूल बी.सी. वसतिगृह**
जेऊर (म.रेल्वे), ता.करमाळा, जि.सोलापूर
**प्रवेश देणे चालू आहे**
इ.स.२०२५-२०२६ करीता प्रवेश देणे चालू आहे.
आमच्या संस्थेच्या बी.सी.(मागासवर्गीय) वसतिगृह अनु.जाती(SC) व अनु.जमाती(ST) यांना प्राधान्य असल्यामुळे या विद्यार्थ्यांनी दि.३०/६/२०२५ पर्यंत अर्ज भरून प्रवेश घ्यावा !
ऑन.सेक्रेटरी
अधिक्षक
भारत हायस्कूल वसतिगृह, जेऊर, ता.करमाळा

MFS
**महावीर**
फरसाण & स्वीट्स
दर रविवारी तुपातील जिलेबी आणि दाबेली मिळेल.

• मलाई बर्फी, काजूकतली, तुपातील बालुशाही मलाई पेढा, कश्मिरी कलाकंद, फरसाण, ढोकळा
• पुण्यातील सुप्रसिध्द बेक मंचचे खारी, टोस्ट, बटर, क्रीमरोल
• नसले बंधू शेंगाचटणी मिळेल.
प्रोप्रा : कौशिक वासाणी (9423376663)
पत्ता : बस स्टॅन्ड शेजारी, पंजाब वस्ताद चौक, मेनरोड, करमाळा.

# साधनाबाई जगताप मुली नं.१ शाळेत प्रवेशोत्सव साजरा




करमाळा(सं.प्र.): नगरपालिकेच्या साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा नं.१ या शाळेत शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पहिलीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, चॉकलेट, फुगे देवून व त्यांचेवर फुलांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेने विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आकर्षक रंगरंगोटी, रांगोळी काढून, फुग्यांची सजावट, सेल्फी पॉईंट करून आनंदमय वातावरण निर्माण केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून माजी नगरसेवक अतुल फंड, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा निर्मला फंड, उपाध्यक्षा आम्रपाली कांबळे, माधुरी पवार, शितल माने, दिपाली बोकन, प्रियंका भुसारे, सारंग परदेशी आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आला. यावेळी हृदयरोग तज्ञ डॉ.चंद्रकांत वीर यांनी त्यांची मुलगी व शाळेची माजी विद्यार्थीनी गायत्री वीर हिच्या स्मरणार्थ विविध स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना रोख स्वरूपाची बक्षीसे दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक रमेश नामदे, निलेश धर्माधिकारी, निलेश भुसारे, सुवर्णा वेळापुरे, सुनिता क्षीरसागर, तृप्ती बेडकुते, भाग्यश्री पिसे, योगिनी चवरे यांनी परिश्रम घेतले.

# शाळेचा दाखला व रजिस्टरवर कुणबीची नोंद करावी

## मराठा सेवा संघाचे गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन



करमाळा(सं.प्र.): पहिली ते बारावी पर्यंतच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर, जनरल रजिस्टरवर कुणबी/ मराठा-कुणबी/ कुणबी-मराठा जातीची नोंद करावी; अशा मागणीचे निवेदन मराठा सेवा संघ करमाळा यांचे वतीने गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आले.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, शैक्षणिक सत्र २०२५-२६ या वर्षात पहिलीमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या व ज्या पालकांकडे कुणबी/ मराठा-कुणबी/ कुणबी-मराठा जातीचा दाखला उपलब्ध आहे. अशा विद्यार्थ्यांची जात जनरल रजिस्टर नं.१ मध्ये वरीलप्रमाणे नमूद करण्यासंदर्भात तालुक्यात असणाऱ्या सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना लेखी आदेश करावेत. तसेच शाळेत दाखल असणाऱ्या व ज्या विद्यार्थ्यांचे हिंदू कुणबी/मराठा कुणबी/कुणबी मराठा जातीचे दाखले उपलब्ध आहेत; अशा विद्यार्थ्यांच्या जनरल रजिस्टर मध्ये जातीची नोंद बदल करण्याचे प्रस्ताव आपल्या कार्यालया मार्फत वरीष्ठ कार्यालयास मंजुरीसाठी सर्व प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापनास लेखी आदेश करावेत. आदी मागण्या निवेदनाव्दारे करण्यात आल्या आहेत. सदरचे निवेदन महादेव फंड, माजी सरपंच बापूसाहेब तनपुरे, मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जमीर सय्यद, दादासाहेब तनपुरे यांचे हस्ते देण्यात आले. या निवेदनावर मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सचिन काळे, पत्रकार अशोक मुरूमकर आदींच्या सह्या आहेत. विद्यार्थी व पालकांनी आपला व आपल्या पाल्याचा कुणबीचा दाखला असेलतर तात्काळ मुख्याध्यापकाशी संपर्क साधून जनरल रजिस्टर वर कुणबी अशी नोंद लावून घ्यावी. ज्यांचा पाल्य पहिलीमध्ये टाकायचा आहे आणि त्यांचा दाखला कुणबीचा असेलतर जात डायरेक्ट कुणबीच टाकावे असे आवाहन संघाचे अध्यक्ष सचिन काळे यांनी केले.

# राज्यस्तरीय एटीएसई परीक्षेत रावगाव शाळेचे यश



करमाळा(सं.प्र.) : मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय एटीएसई परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रावगाव मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यात शंभुराजे बरडे याने २६४ गुण मिळवून केंद्रात प्रथम, जिल्ह्यात १० वा व राज्यात १७ वा., प्रयाग कांबळे याने २५८ गुण मिळवून केंद्रात दुसरा, जिल्ह्यात १३ वा, राज्यात २० वा तसेच सृष्टी नागवले हिने २५० गुण मिळवून तिचा केंद्रात पाचवा, जिल्ह्यात १७ वी, राज्यात २४ वी व श्रुती कोळेकर हिने २२० गुण मिळवून केंद्रात १७ वी, जिल्ह्यात ३२ वी व राज्यात ३९ वा क्रमांक मिळवून गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. अजिंक्य पवार (२०८), तसमिया शेख (१९८), समर्थ शिंदे (१९८), विराज शिंदे (१८४), अनन्या पवार (१७८), रिया पवार (१५०) यांनी यश प्राप्त केले आहे. या परीक्षेत शाळेचा शंभर टक्के निकाल लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी शाळेने उज्वल यश संपादन केल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, विस्तार अधिकरी टकले, कदम., केंद्रप्रमुख मिरगणे, मुख्याध्यापक पाटुळे, सरपंच संदीप शेळके, उपसरपंच भाऊसाहेब करगळ, सुरेखा फुंदे, ग्रा.पं.सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्य भागवत बरडे, उपाध्यक्ष सुहास जौंजाळ, सर्व सदस्य व ग्रामस्थ यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक महेंद्र शिंदे यांचे अभिनंदन केले.

**श्री गजानन अगरबत्ती**
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा (प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, 8007255456)

**पुनम एजन्सी**
Ambuja Cement
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

Scanned with OKEN Scanner

अभिजीत कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट
• पत्ता •
शिवाजीनगर, करमाळा.
प्राचार्य बिभिषण गुंड
मो.9975681947
MS-CIT
TALLY
DTP

कोर्ससाठी प्रवेश चालू आहे..!

## भाजपाचे गणेश चिवटे यांच्या संकल्पनेतून

# फिसरे जि.प.प्राथमिक शाळेत शालेय साहित्याचे वाटप



करमाळा(सं.प्र.): भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या संकल्पनेतून फिसरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी उद्योजक भरत अवताडे, सरपंच हनुमंत रोकडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण कणसे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना वह्या व इतर शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी गणेश चिवटे म्हणाले, की विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मोफत उपलब्ध करून देणे ही काळाची गरज होती. सध्या पेरणीचे दिवस आहे. आपल्या भागात सर्वच शेतकरी वर्ग आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर बी-बियाणे खते यांचा आर्थिक ताण आहे. या उपक्रमामुळे पालकांवरील आर्थिक भार कमी होवून वेळेची बचत होईल व विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्य टिकून राहील; या उद्देशाने हा उपक्रम राबविला असल्याचे सांगितले. यावेळी भाजपाचे रामा ढाणे, नानासाहेब अवताडे, दादासाहेब चाळक, रामभाऊ खंडागळे, दशरथ निकम, ज्ञानेश्वर चाळक, धनंजय अवताडे, नवनाथ चाळक, मोहन नेटके, विनोद नेटके, प्रमोद पाटील, सोमनाथ पाटील, नानासाहेब साबळे, सुमित अवताडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी : राष्ट्रीय समाज पक्षाची मागणी

करमाळा(सं.प्र.): शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी; अशा मागणीचे निवेदन राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने नायब तहसीलदार विजय लोकरे यांना देण्यात आले. यावेळी रासपचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, बाळासाहेब टकले, जगन्नाथ सलगर, नामदेव पालवे, शिवाजी खटके, विकास मेरगळ, सुधीर ठोंबरे, सुनील बंडगर, रघुनाथ खटके, यशवंत सलगर, शंकर सुळ, दिपक कडू आदी उपस्थित होते. सदरच्या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास रासपच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल; असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांनी दिला आहे.

भाड्याने देणे आहे
करमाळा शहरातील वेताळपेठ येथील दुकानासह राहण्यासाठी व स्वतंत्र दुकान भाड्याने देणे आहे
संपर्क : मो.नं.9420093303

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरद्वारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रु. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# आबा गेले.. पण आठवणींचा वसा शिल्लक !



आज शब्द थांबलेत, डोळे भरून आलेत आणि काळजाने एक दीर्घ उसासा घेतलाय. कारण नारायण भागुजी कुऱ्हाडे उर्फ 'आबा' यांचे २० जून रोजी निधन झाले.., हे वाक्य उच्चारताना मन अनेक आठवणींनी गलबलून जातंय. कारण आबा म्हणजे फक्त कुऱ्हाडे परिवारातील एक वडिलधारी व्यक्ती नव्हते. तर ते एक संयमाचे प्रतिक, ज्ञानाचे दीपस्तंभ आणि माणुसकीचा गाभा होते. त्यांच एक सामान्य आयुष्य, पण असामान्य जगणं होतं..! कष्ट, साधेपणा आणि शिस्तीच्या मार्गावर त्यांनी आपलं संपूर्ण जीवन घडवलं. शेतीची घडण, जनावरांची सेवा आणि त्याचबरोबर घरात वाचन संस्कृतीची पायाभरणी; हे सगळं ते इतक्या नैसर्गिक पध्दतीने करायचे की कोणालाही ते कधी कृत्रिम वाटलं नाही. त्यांच्या कामात शिस्त आणि सौंदर्य दोन्ही जाणवायचं. वाचन हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. एखाद्या माणसाचं वाचन करून मन मोठं होतं.. ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरवावी; तर ती आबांनीच..!

आबा हे वडीलपणाचं खरं उदाहरण आहेत..! आबांनी आपली दोन मुले राजेंद्र (सेल टॅक्स विभागात उपायुक्त) आणि सुधीर (एक आदर्श शेतकरी) यांना फक्त वाढवलं नाही तर सुसंस्कार, शिस्त आणि आत्मविश्वास यांची शिदोरी दिली. त्यांच्या दोन कन्या मिनाक्षी (सातपुते) व योगिता (पांढरे) या आपल्या कुटूंबात सुखी आहेत, ही त्यांच्या पालकत्वाची पुन्हा एक ग्वाही. नातवंड डॉक्टर, इंजिनिअर होऊन पुढची पिढी समृध्द बनली आहे.., हे पाहून त्यांच्या डोळ्यातून अनेकदा समाधानाचे आश्रु वाहायचे. आजारपणातही संयम आणि शेवटपर्यंत उत्साह कायम होता. गेल्या पाच वर्षापासून आबा आजाराशी झुंज देत होते. पण त्यांच्या चेहऱ्यावर कधीही थकवा नव्हता. एकामागोमाग एक आजार येत होते. वहिनी (सखुबाई) यांनी अहोरात्र सेवा केली. ज्या व्यक्तीने आयुष्यभर मी हरायचं नाही.. ही वृत्ती जपली, तीच वृत्ती त्यांच्या आजारपणातही दिसून आली. दि.२६ मे २०२५ रोजी त्यांच्या लग्नाचा ५८ वा वर्धापन दिवस अगदी आनंदात साजरा झाला. मुलं, नातवंड, पाहुणे सगळ्यांच्या उत्साहात ते खुद्द सहभागी होते. प्रत्येकजण "आबा शतायुष्य होणार" म्हणत होते. पण नियतीने ही भावना क्षणात हिरावून नेली.

आता आबा या शरीररूपात नाहीत. पण त्यांनी दिलेल्या मूल्यांचं, विचारांचं आणि संस्कृतीचं बीज एवढं खोलवर रोवलेलं आहे, की त्यांच्या आठवणी आमच्या प्रत्येक कृतीत दिसतील. घरात पुस्तकांच्या कपाटाजवळ थांबताना त्यांची आठवण येईल. अंगणात जनावरांच्या पायात लावलेली गुंडाळी बघताना त्यांचा सहवास आठवेल. पण त्यांचा आवाज, आज नीरव शांततेत हरवून गेलाय. आबा गेले.. पण त्यांनी उभं केलेलं कुटूंब, संस्कार आणि मूल्य याचं देणं हे काळाच्या कसोटीतही जपलं जाईल. ते एक झाड होते - ज्यांनी सावली दिली, फळं दिली आणि शेवटी मुळं खोलवर रोवून आपलं अस्तित्व जगात ठेवून गेले..! "तुम्ही नव्हता एक व्यक्ती.., तुम्ही होता एक विचार !" आबांना भावपूर्ण श्रध्दांजली !!

...ॲड.डॉ.बाबुराव हिरडे

विद्यार्थी वसतिगृह प्रवेश
श्री यशवंत प्रसाद शिक्षण प्रसारक मंडळ, साडे संचलित
विद्यार्थी वसतिगृह, साडे ता.करमाळा.
(बी.सी.मुलांसाठी)
खालील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देणे चालू आहे. वसतिगृहात अनुसूचित जाती(SC) व अनुसूचित जमाती(ST) मुलांना प्राधान्य आहे. गरजू विद्यार्थ्यांनी दि.३०/६/२०२५ पर्यंत प्रवेश घेण्याविषयी अवाहन करण्यात येत आहे.
अधिक्षक
विद्यार्थी वसतिगृह, साडे (संपर्क :८८८८०४९६०२)
सचिव
यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, साडे

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

Scanned with OKEN Scanner

YASH BOMBAY DYEING



करमाळा शहरामध्ये प्रथमच... फ्रेश व नविन मालाचा सेल...

# महा मान्सून सेल

शुटींग, शर्टिंग, डिझायनर साड्या, ड्रेस मटेरियल, रेडिमेड, बेडशीट, पिलो कव्हर, टॉवेल्स, नॅपकिन, ब्लँकेट, चादर, सतरंजी, पायपुसणी इ.
**सर्व फ्रेश व भरपूर व्हरायटी मध्ये उपलब्ध.**



# यश

| कलेक्शन | लाईफस्टाईल | सारीज | शॉपी |
|---|---|---|---|
| मेनरोड, करमाळा | राजवैभव मंगल कार्यालय शेजारी, नातेपुते | जय महाराष्ट्र चौक, मेनरोड, करमाळा | गुजर गल्ली, करमाळा |

मेनरोड, करमाळा ✆ 9150 31 1008

---

श्री रामचंद्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित

# स्नेहालय न्यू इंग्लिश स्कूल, करमाळा.



**CBSE PATTERN**

**नर्सरी ते इ.६ वी पर्यंत प्रवेश सुरू !**

मान्यता.. नर्सरी ते १२ वी (सर्व शाखा)

## स्कूलची वैशिष्ट्ये

- मर्यादित विद्यार्थी संख्या
- विद्यार्थ्यास वैयक्तीक मार्गदर्शन
- आरटीई २५% प्रवेश
- भव्य शालेय इमारत, हवेशीर वर्गखोल्या
- विविध खेळासाठी प्रशस्त क्रिडा मैदान
- विविध खेळणीयुक्त बगीचा
- संपूर्ण शाळा सीसीटीव्ही कक्षेत
- खेळाचे विविध शैक्षणिक साहित्य उपलब्ध
- मुक्तपणे संवाद, बोलक्या भिंती, स्वयंअध्ययन, स्वच्छता व स्वयंशिस्त
- प्रशिक्षित कर्मचाऱ्यासह सुरक्षित सेवा
- सीबीएसईवर आधारीत अभ्यासक्रम
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नूसार कौशल्य विकासावर आधारीत
- इंग्रजी, सेमी इंग्रजी वर्ग सुरू
- प्रशिक्षित गुणवत्ताधारक, प्रेमळ, होतकरू, कष्टाळू, अभ्यासू, अनुभवी शिक्षक वृंद
- वयानुरूप अशी ज्ञानाची बांधणी
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर
- गोष्टी सांगताना बोलक्या बाहुल्यांचा वापर
- विविध स्पर्धांचे आयोजन
- विविध उपक्रम व खेळण्याद्वारे शिक्षण
- सण व उत्सव साजरे
- शिक्षण मजेदार बनविण्यासाठी विविध कविता व गोष्टींचा वापर
- पालकांचे समुपदेशन
- मुलांच्या अंगी असणारे सुप्त गुण ओळखून संधी
- विविध सहशालेय उपक्रमामध्ये पालकांचा सहभाग
- शिक्षक व पालक सभेचे नियमित नियोजन
- विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन शिबीर

**शैक्षणिक वर्षातील शालेय उपक्रम**





श्री.जयंत रामचंद्र दळवी (संस्थापक/अध्यक्ष)

सौ.धनश्री जयंत दळवी (सचिव/मुख्याध्यापिका)

**युनिट १**
करमाळा-पुणे रोड, तुकारामनगर पाठीमागे रोशेवाडी मो.9075404200, 9975682333

**युनिट २**
श्री कमलादेवी रोड, LIC ऑफिस जवळ, कृष्णाजीनगर करमाळा. मो.9975682333, 9075404200

**ऑफिस पत्ता :** सा.कमलाईनगरी कार्यालय, टाऊन हॉल शापींग सेंटर. पुणे रोड, करमाळा. email : snesk2016@gmail.com

Scanned with OKEN Scanner